# भारतीय स्वातंत्र सेनानी अवध क्रांतीकारी बेगम हजरत महल

**Miss. Ratnavali Pandurang Pachhapure**
Student, Department of History
Smt.Akkatai Ramgonda Patil Kanya Mahavidyalaya,
Ichalkaranji, Dist Kolhapur

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्य भारतासाठी अनेक लढाई झाल्या होत्याकितीतरी लोकांची बळी गेलेया आपल्या भारताला इंग्रजांच्या जाळयातून स्वातंत्र्य करण्यासाठी कित्येक जीवांची आहुती आपल्या वीरांना द्यावेलागलेआहे. या भारत भूमीनेआपलेलाखो हजारो पुत्र गमावलेआहेत पण यामध्येफक्त पुत्र नव्हेतर स्वतःच्या भारत मातेसाठी स्वातंत्र्याची स्वप्न बाळगणारेअनेक स्त्रिया देखील होत्या. त्यात अनेक स्त्रियांमध्येवीर सेनानी बेगम हजरत महल ही एक विरांगणा सुद्धा होती जिनेसत्तेसाठी नव्हेतर स्वातंत्र्यासाठी लढण्यास प्राणांची बाजी लावली, जिनेअपयशानेमागेन हटता निर्भयपणेतोंड दिले. अशा वीर आणि शूर स्त्रीचेनाव इतिहासात सुवर्णअक्षरांनी कोरल गेलं अठराशे सत्तावनच्या लढाई नंतर हेनाव हरवून गेलं अशीच "वीर बेगमहजरत महल".

**जीवन परिचय :-**

बेगम हजरत महल यांचा जन्म सन १८२०१ मध्येफैजाबाद येथेगरीब कुटुंबात झाला.लहानपणी त्यांचं नाव मोहम्मद खानम असेठेवलेगेलेत्यांच्या आई-वडिलांनी पैशासाठी एका राजेशाही घराण्यामध्येत्यांना विकलं गेलं तेथेत्या नर्तिकीचेकाम करत तेथे त्यांना मेहकपरी या नावाने'ओळखलेजात तिथेच त्यांचा संबंध अवध नवाब वाजीद अली शहा यांच्याशी आला रूपवान असल्यामुळे नवाबानेत्यांच्याशी दुसरा विवाह केला त्यावेळी त्यांना इफ्ति खार-उन-निसा असेनाव देण्यात आलेनंतर त्यांना पुत्ररत्न झालेत्यावेळी नवाबाने खुश होऊन बेगम हजरत महल ही पदवी बहाल केली ही पदवी त्यांना बिर्जिस क्वादर याच्या जन्मामुळे मिळाली. हजरत महल म्हणजेच महान व्यक्ती किंवा स्त्री अशा दोन शब्दात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचेवर्णन केले गेले.4

**जीवन कार्य:-**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्येनारीशक्ती उफाळून बाहेर आलेली दिसतेत्यामध्येराणी लक्ष्मीबाई, झलकार बाई, दुर्गाभाभी, राणी गौतिल्या, उदादेवी, यांच्यासोबतच वीर सेनानी बेगम हजरत महल यादेखील होत्या. सन १८५७ साली भारताची पहिली महिला स्वतंत्र सेनानी म्हणून इतिहासाच्या सुवर्णपणावर त्यांचं नाव कोरल गेलं२ १८१८ चा मराठी सत्तेनंतर इंग्रजांनी भारतावर कब्जा करून स्वतःची सत्ता प्रस्थापित केले. अन्यायी जुलमी कायदे केलेसाम्राज्य विस्तारासाठी कित्येकांची हत्या केली. अनेक राजांच्या सत्तेवर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले3. त्यावेळी लखनऊमध्येविद्रोह होण्यास सुरू झाले. ब्रिटिशांनी ज्यावेळी नवाब शहायांना सिंहासनावरून पाय उतार होण्याचा आदेश दिला तेव्हा त्यांनी प्रतिकार न करता तेथून निघून गेले. नवाब वाजिद अली शहा यांना जबरदस्ती कलकत्तेस पाठवून दिलेआणि त्यांचा मुलगा बिरजेस याला सत्तेवरून नाकारलं.5 तेथून त्यांना सर्वकाही सोडून जावंलागलं परंतुभारतात पसरलेलेब्रिटिशांचेजुलमी अत्याचार धार्मिक भावनांवर केलेला प्रहार हिंदू मुस्लिम यांना दिला जाणारा त्रास हेपाहून उफाळून उठणाऱ्या बेगम हजरत महल यांनी सत्तेपेक्षा स्वातंत्र्यासाठी लढण्यास सज्ज झाल्या.ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीमध्येसर्वांना एकत्र करून लढण्यास प्रेरणा दिलेहार मानणाऱ्या अनेक लोकांना शिपायांना प्रोत्साहित केलेत्यांचेधैर्यवाढविले आणि लढाईत मागेन हटून देता विजय मिळवून ब्रिटिशांच्या सत्तेने त्यांचे शासन चालू दिले नाही6. त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला हार पत्करावी लागली पण त्या कधीच खचल्या नाही हार मानली नाही. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी यांच्याविरुद्ध लढण्यासाठी सेना फार कमी होती त्यावेळी त्यांनी शेजारील राजेराजवाड्यांची भेटून त्यांच्याशी मैत्रीचेनाते निर्माण करून स्वातंत्र्यसंग्रामात मदत घेतली. मराठ्यांचेनानासाहेब पहिला फैजाबादजचेमौलवी यांच्या

मदतीनेलखनऊ आग्रा अवध येथे१८५७ इंग्रजांचा विद्रोह करण्याचेनेतृत्व त्यांनी स्वतः केले4. २३सप्टेंबर १८५८ साली एका योद्धेप्रमाणेहत्तीवर बसून लढणारी एक महिला होती जिला काही वेळेला तवायफ म्हणल जात होतं. ती स्त्री उभ्या भारताच्या शत्रूंशी लढत होती पतीचा अपमान, मुलाचा हक्क नाकार, धर्मधर्मांचा नाश, अशा अनेक गोष्टींचा राग अन्यायाला बळी पडणारेस्त्री अबला नाही तर ती सबला आहे हेदाखवून देणारी एक वीर सेनानी म्हणून प्रथम भारतीय महिला होय. जिनेइंग्रजांच्या नाकात दम करून ठेवलेलेहजरत महलने३० जुन १८५७5 साली ब्रिटिश सेना आणि भारतीय विद्रोही यांच्यात इस्माईल गंज चिनहाट अवध जवळ हजरत महल आणि मौलवी शहा आणि इंग्रज नेतृत्व करणारेसर हेन्री लॉरेन्स7यांच्यात लढाई झाली या लढाईत हेन्री लॉरेन्स मृत्यूपावला आणि भारतीय सेनानेलढाई जिंकली. त्यानंतर ५ जून १८५७ आपल्या मुलास बिरजेस क्वादर यास ताज घालून मार्च१८५८ पर्यंत लखनऊ मध्येइंग्रजांविरुद्ध लढाईत विद्रोहाचेनेतृत्व केले. त्यानंतर तीन महिन्यापर्यंत पसरलेल्या रेसिडेन्सीच्या घेरबंदी केला तीन महिने घेरबंदीच्या दरम्यान ३०० हुन ,अधिक इंग्रज मारलेगेलेकाही फरार झाले.5आलमबाग मधील महल मध्येराणी राहत होती त्यावेळी इंग्रजांनी नऊ वेळा हल्लेकेलेया सर्वांना तोंड द्यावे लागले.

ज्यावेळी इंग्रजांच्या आदेशानेलखनऊ आणि अवध चेअधिक भाग इंग्रजांनी कब्जा केला त्यावेळी हजरत महल यांना माघार घ्यावेलागली त्यांनी नानासाहेब सोबत शहाजाहापूर वर हल्ला केला पण तेथेही त्यांना इंग्रजांनी मात दिली. लखनऊ मध्येअनेक स्त्रियां ना व त्याचबरोबर त्यांच्या दासींना एकत्र करून संघटन केले त्यांना प्रशिक्षण दिलेलढण्यास सामर्थ्यशील बनवलं तोफ चालवण्यास बंदूक चालवण्यास शिकवलं उदादेवी ही त्यांच्यामधीलच एक वीर स्त्री आहे.लखनवचेतवयाफ म्हणून ओळखलेजाणारी हैदरी बाई यांच्याकडे तमाम इंग्रज अफसर येत असल्यानेखूप वेळा क्रांतिकार यांच्या विरोध चालणारेयोजना यांच्यावर विचार6 केलेजात हे सर्वहैदरी बाई सर्वयोजना क्रांतिकारस गुप्तुतपणेकळवत आणि बेगम हजरत महल यांना मदत करत त्यांनी आपलं देश प्रेम व्यक्त केलं.

**अंतिम कार्य:-**

पतीच्या मालमत्तेवर हक्क गमावून १८५८ युद्ध तीन वेग वेगळ्या प्रसंगी ब्रिटिशांनी केलेल्या युद्धविराम स्वीकारून त्या अवध मधील जुना राज्यात प्रमुख स्थानेमोठ्या थाटामाटात परत येऊ शकली असती6 पण रक्त आणि अश्रू मध्येज् विरघळलेल्या महान चळवळी नंतर इंग्रजांनी त्यांना पुन्हा घरी परतवण्यासाठी किमान आराम आणि आरामदायी जीवनासाठी आमंत्रित केलेपण प्रत्येक वेळी त्या तिरस्कारानेनाकारलेस्वेच्छेने हद्दपार होऊन शेवटच्या दिवसांमध्येत्यांना नाईलाजानेत्यांना नेपाळला2 जावेलागलेत्यांना त्यांची इच्छा असून सुद्धा मातृभूमीकडे येता आलेनाही इंग्रजांनी अनेक चौखी पहारा लावली त्यांना कायदे लावलेगेलेअसेअसून सुद्धा कठीण झालेनेपाळचेजंग बहादूर यांनी त्यांना शरण देणार पण काही कालांतरानेत्यांना आश्रय दिला तिथेच त्या वनवासी जीवन व्यतीत करू लागल्या4 आणि मातृभूमीकडे जाण्याचेमार्गशोधूलागल्या परंतु१८८९ मध्ये त्यांचा मृत्यूझाला काठमांडू येथेजामा4 मज्जि द च्या मैदानामध्येएका अज्ञात कब्र मध्येदफन केलेगेलेत्यांच्या मृत्यूनंतर राणी विक्टोरिया यांच्या जन्मदिनानिमित्त ब्रिटिश सरकारनेबेरजेस क्वादर या त्यांच्या मुलास माफ करून परत माय भूमी बोलावून घेतले4. एका गरीब कुटुंबातील मुलगी राणीच्या उंची वर जाऊन इतिहासाच्या एका अशा स्थानावर पोहोचली जिथेतिची स्वातंत्र्यसाठीची निस्वार्थभक्ती प्रेम तिचेध्येय सदैव इतिहासात प्रेरणादायी ठरतील सर्वराष्ट्राच्याशूर आणि सच्चा हृदयाच्या आजारास पात्र अशा इफ्तिरखार-उन-सा3 खरोखरच सर्वमहिलांचा अभिमान होत्या.

**सन्मान चिन्ह :-**

त्यांच्या वीर आणि धाडसी कार्याबद्दल भारत सरकारद्वारे१० मे१९८४ साली त्यांच्या डाक तिकीट चालू केले. तसेच बेगम हजरत महल यांच्या नावेनवी तेबारावीपर्यंत च्या विद्यार्थ्यांना नॅशनल स्कॉलरशिप दिलं जात5.

**संदर्भ:-**

१) १८५७ के अमर सेनानी-बेगम हजरत महल- के. सी. यादव

२) बेगम हजरत महल-प्रो. शर्माअशोक कुमार

३) १८५७ के विद्रोह की वीरांगना-बेगम हजरत महल-सिंह गेला वत्सल

४) In the city of gold & silver-The story of Begum Hazrat Mahal-KENIZE MOURAD

५) A Begum & A Rani Hazarat Mahal & Lakshmibai, Mukherjee Rudrangshu

६) Awadh in revolt, 1557-1858 Mukherjee Rudrangshu 1984

७) DD. National Swaraj Serial. MyGovAuth.